सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक ०२/०२/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. सीसीटीएनएस -३६१५/ प्र.क्र.९०/भाग-२/पोल-३, दिनांक ०१ फेब्रुवारी, २०२४.

**विषय :-** सीसीटीएनएस प्रकल्प सल्लागार म्हणून नियुक्त केलेल्या मे. पीडब्ल्युसी कंपनीस माहे जुन, २०२३ ते ऑगस्ट, २०२३ या कालीवधीकरीता केलेल्या कामाचे देयक अदा करणेबाबत.

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. सीसीटीएनएस -३६१५/ प्र.क्र.९०/भाग-२/पोल-३, दिनांक ०१ फेब्रुवारी, २०२४. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०२०११७०८३५९२२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
कार्यासन अधिकारी, का.क्र. १७

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "वित्त व लेखा" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**सीसीटीएनएस प्रकल्प सल्लागार म्हणून नियुक्त केलेल्या मे. पीडब्ल्युसी कंपनीस माहे जून, २०२३ ते ऑगस्ट, २०२३ या कालावधीकरीता केलेल्या कामाचे देयक अदा करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः सीसीटीएनएस-३६१५/प्र.क्र.९०/भाग-२/पोल-३**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

दुसरा मजला, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

दिनांक : १ फेब्रुवारी, २०२४

वाचा :

१. राष्ट्रीय गुन्हे अन्वेषण केंद्र, केंद्रीय गृह मंत्रालयाचे पत्र क्र.SIB (103)/CCTNS/SPMU/60/NCRB-2001, दि.१७.०९.२०१२.

२. राज्य गुन्हे अन्वेषण केंद्र, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे व मे. प्राईस वॉटर हाऊस कुपर्स प्रा. लि., यांच्यामध्ये झालेला करार दि.२९.०८.२०१२.

३. शासन निर्णय, माहिती व तंत्रज्ञान विभाग क्र. GAD-मातंस 080/4/2014-O/O Directorate of IT-DIT (MH), दि.०१.०७.२०१४, दि.०९.०५.२०१९. व दि. २४.४.२०२३

४. शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटीएनएस ३६१५/प्र.क्र.९०/भाग-१/पोल-३, दि.१३.०६.२०१६.

५. केंद्रीय गृह मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.F.No.22011/02/2010-SR/CCTNS P-1, दि.१८.०७.२०१६.

६. अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.CID/SCRB/CCTNS/142/2017, दि.०१.०६.२०१७.

७. अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.CID/CCTNS/SPMU Extn/6893/2018, दि.२०.११.२०१८.

८. शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीसीटीएनएस-३६१५/प्र.क्र.९०/भाग-१/पोल-३, दि.१५.१०.२०१९ व दि.२६.०७.२०२१.

९. मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्य शिखर समितीच्या दि.२०.०७.२०२०, दि.१८.०५.२०२१ व दि.१०.०५.२०२२ व दि. १२.७.२०२३ रोजीच्या बैठकीचे कार्यवृत्त.

१०. शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीसीटीएनएस-३६१५/प्र.क्र.२०२/भाग-३/पोल-३, दि.०१.०७.२०२२.

११. शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीसीटीएनएस-३६१५/प्र.क्र.९०/भाग-२/पोल-३, दि.१४.११.२०२२.

१२. शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीसीटीएनएस-३६१५/प्र.क्र.२०२/भाग-५/पोल-३, दि.२९.८.२०२३.

१३. शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीसीटीएनएस-३६१५/प्र.क्र.९०/भाग-२/पोल-३, दि.२२.९.२०२३.

१४. अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/१७/६१६२/CCTNS/१५/२०१०, दि.१६.१.२०२४.

१५. मे. प्राईस वॉटर हाऊस कुपर्स प्रा.लि.यांचे दि.२३.१.२०२४ रोजीचे ईमेल.

१६. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३,दि.१२.०४.२०२३.

Scanned with CamScanner

**प्रस्तावना :**

केंद्र शासनाच्या ई-गर्व्हनन्स योजनेंतर्गत गुन्हा व गुन्हेगारी माग काढण्यासाठी नेटवर्क यंत्रणा (Crime and Criminal Tracking Network System) हा प्रकल्प Mission Mode Project म्हणून संपूर्ण देशामध्ये राबविण्यात येत आहे. राज्य गुन्हे अन्वेषण केंद्र, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे व मे. प्राईस वॉटर हाऊस कुपर्स प्रा. लि., यांच्यामध्ये दि.२९.०८.२०१२ रोजी करार झाला. सदर प्रकल्प कार्यान्वित होईपर्यंतचा सर्व खर्च भागविण्यासाठी केंद्र शासनामार्फत निधी वितरीत करण्यात आला आहे. सदर प्रकल्पासाठी राष्ट्रीय गुन्हे अभिलेख केंद्र, केंद्रीय गृह मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दि.१७.०९.२०१२ रोजीच्या पत्रान्वये मे. प्राईस वॉटर हाऊस कुपर्स प्रा. लि. या कंपनीची राज्य प्रकल्प व्यवस्थापन युनीट (State Project Management Unit) म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. शासन निर्णय, गृह विभाग दि.१५.१०.२०१९ अन्वये मे. पीडब्ल्युसी कंपनीच्या एका व्यवस्थापकीय सल्लागारास व दोन वरिष्ठ सल्लागारास पुर्णवेळ तत्वावर दि.०१.०६.२०१९ ते दि.३१.०५.२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. शासन निर्णय, गृह विभाग दि.२६.०७.२०२१ अन्वये मे. पीडब्ल्युसी कंपनीच्या एका व्यवस्थापकीय सल्लागारास व दोन वरिष्ठ सल्लागारास पुर्णवेळ तत्वावर दि.०१.०६.२०२० ते दि.३१.०५.२०२१ पर्यंत व मे. पीडब्ल्युसी कंपनीच्या एका व्यवस्थापकीय सल्लागारास व एका वरिष्ठ सल्लागारास पुर्णवेळ तत्वावर दि.०१.०६.२०२१ ते दि.३१.०५.२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय, गृह विभाग दि.१४.११.२०२२ अन्वये मे. पीडब्ल्युसी कंपनीच्या एका व्यवस्थापकीय सल्लागारास व दोन वरिष्ठ सल्लागारास दि.०१.०६.२०२२ पासून ६ महिन्याकरिता तसेच एका व्यवस्थापकीय सल्लागारास व एका वरिष्ठ सल्लागारास पुढील ६ महिन्याकरिता Milestone तत्वावर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच तद्‌नंतर शासन निर्णय, गृह विभाग दिनांक २९.८.२०२३ च्या शासन निर्णयान्वये १.६.२०२३ ते ३१.५.२०२४ पर्यंत पीडब्ल्युसी कंपनीच्या एक व्यवस्थापकीय सल्लागार दोन वरिष्ठ सल्लागार यांना दि. १.६.२०२३ ते ३१.५.२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि.१६.१.२०२४ च्या पत्रान्वये सीसीटीएनएस प्रकल्पाचे प्रकल्प सल्लागार मे.पीडब्ल्युसी कंपनीने माहे जून२०२३ ते ऑगस्ट,२०२३ मध्ये केलेल्या कामाचे संदर्भ क्र. १४ येथील पत्रान्वये कामाचे देयक अदा करण्याबाबत विनंती केली आहे. तसेच संदर्भ क्र. १५ ई-मेलद्वारे मे.पीडब्ल्युसी कंपनीने देयकांबाबत तपशिल सादर केला आहे. माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या दि.९.५.२०१९ च्या शासन निर्णयान्वये निश्चित केल्यानुसार त्यांना मानधन अनुज्ञेय करण्यात आला आहे. त्यानुसार सदर देयके अदा करण्याची बाब विचाराधीन होती. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

**<u>शासन निर्णय</u> :**

सीसीटीएनएस प्रकल्पासाठी मे. पीड्ब्ल्युसी कंपनीची प्रकल्प सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. माहिती व तंत्रज्ञान विभाग, शासन निर्णय दि.०९.०५.२०१९ अन्वये निश्चित केल्यानुसार त्यांना मानधन अनुज्ञेय करण्यात आले आहे. त्यानुसार सीसीटीएनएस प्रकल्पासाठी **माहे जून २०२३ मध्ये मे. पीड्ब्ल्युसी कंपनीच्या एका व्यवस्थापकीय सल्लागारास व एका वरिष्ठ सल्लागारास** पुर्णवेळ तत्वावर तसेच **माहे जुलै २०२३ ते ऑगस्ट २०२३** या दोन महिन्यांच्या कालावधीसाठी **एका व्यवस्थापकीय सल्लागारास व दोन वरिष्ठ सल्लागारास** पुर्णवेळ तत्वावर पाहिलेल्या सल्लागाराच्या कामासाठी जीएसटी सह एकूण



Scanned with CamScanner

**रु.२५,१०,८७६/- (रुपये पंचवीस लाख दहा हजार आठशे शाहत्तर फक्त)** इतक्या रकमेची देयके मे.पीड्ब्ल्युसी कंपनीस खालील तपशिलप्रमाणे अदा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

| # | Month | Resource Name | Designation | Man month rate | Per Day Rate | Available Days | Applicable Amount per Resource (INR) | Sub Total (INR) | GST @18% | OPE Claimed | Total Amount (INR) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Jun-23 | Anil Dongardiye | Managing Consultant | 306900 | 10230 | 30 | 306900 | 584100 | 105138 | 0 | 689238 |
| | | Haresh Imale | Senior Consultant | 277200 | 9240 | 30 | 277200 | | | | |
| 2 | Jul-23 | Anil Dongardiye | Managing Consultant | 306900 | 9900 | 31 | 306900 | 682461 | 122843 | 0 | 805304 |
| | | Priyanka Khandare | Senior Consultant | 277200 | 8941.93 | 11 | 98361 | | | | |
| | | Haresh Imale | Senior Consultant | 277200 | 9240 | 31 | 277200 | | | | |
| 3 | Aug-23 | Anil Dongardiye | Managing Consultant | 306900 | 9900 | 31 | 306900 | 861300 | 155034 | 0 | 1016334 |
| | | Priyanka Khandare | Senior Consultant | 277200 | 9240 | 31 | 277200 | | | | |
| | | Haresh Imale | Senior Consultant | 277200 | 9240 | 31 | 277200 | | | | |
| TOTAL | | | | | | | | 2127861 | 383015 | | 25,10,876 |

२. अ) उपरोक्त रकमा संदर्भ क्र.३ मध्ये नमुद दि. ९.५.२०१९ च्या शासन निर्णयान्वये निश्चित केल्यानुसार सीसीटीएनएस प्रकल्पासाठी सल्लागारांना दरमहिना दरमाणुस (Man-Month) तत्वानुसार अदा करण्यात येत आहे.

ब) शासन निर्णय संदर्भ क्र.३ दि. ९.५.२०१९ नुसार सल्लागारांना प्रकल्पावर होणा-या खर्चाच्या ५% च्या प्रमाणात प्रवास, भोजन व निवास इ. खर्च अनुज्ञेय करण्यात आला आहे.

क) मे. पीड्ब्ल्युसी कंपनीने सादर केलेल्या देयकानुसार सदर रक्कम देण्यात येत आहे. सदर रकमेमध्ये माहे जून, २०२३ ते ऑगस्ट, २०२३ या दोन महिन्यांसाठी १८% वस्तू आणि सेवा कर समाविष्ट करण्यात आला आहे.

ड) सीसीटीएनएस प्रकल्पासाठी संबंधित कंपनीला सल्लागारांच्या मानधनापोटी जादा रक्कम अदा केली आहे असे निदर्शनास आल्यास अशी जादा रक्कम संबंधित कंपनीकडून समायोजीत करण्याचा अधिकार शासनास राहील.

इ) सदर देयके आयकर व इतर प्रचलीत कर वजाती करून अदा करण्यात यावी.

३. यासाठी होणारा खर्च "मागणी क्र.बी-१, २०५५-पोलीस, (००) १०९ जिल्हा पोलीस, (००) १४ गुन्हा व गुन्हेगारी माग काढण्यासाठी नेटवर्क यंत्रणा (राज्य योजना), दत्तमत, (२०५५ ए०९७), "५०- इतर खर्च" या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२४ साठी मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर निधी कोषागारातून आहरित करण्यासाठी अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना "नियंत्रक अधिकारी" व त्यांच्या अधिनस्त आहरण व संवितरण अधिकाऱ्याला "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.



Scanned with CamScanner

५. सदर शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उपविभाग-दोन, महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, १९६५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार व अ.क्र.२७अ, नियम क्र.७६ अन्वये प्रशासकीय विभागाला असलेल्या अधिकारानुसार तसेच शासन निर्णय, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.१२.०४.२०२३ अनुसार सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या ९ महिन्यांच्या कालावधीसाठी अनिवार्य खर्चाकरिता निधी वितरणास दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०२०११७०८३५९२२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RUPALI SANJOG KABARE

Digitally signed by RUPALI SANJOG KABARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=825ec39543f0d33deccec30f6ca54b1adc430443efec55f07e98dc173423779d, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5CB43A03D973FF96AABBF02A74864A4681399FE663D8FBDE0441A596BEB3ACDD, cn=RUPALI SANJOG KABARE
Date: 2024.02.01 17:08:02 +05'30'

(रुपाली कबरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव (विशेष) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
५. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. अपर पोलीस महासंचालक (नि व सं), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अभिलेख केंद्र, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. सह व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई.
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
११. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१३. मे. पीडब्ल्युसी प्रा.लि., २५२, वीर सावरकर मार्ग, शिवाजी पार्क, दादर, मुंबई - ४०० ०२८.
१४. वित्त विभाग (व्यय-७/ वित्तीय सुधारणा). मंत्रालय, मुंबई.
१५. कक्ष अधिकारी (अर्थसं-१), गृह विभाग. मंत्रालय, मुंबई.
१६. निवडनस्ती, पोल-३.



Scanned with CamScanner